# Yashoda Girls’ Arts & Commerce College, Nagpur

## Department of Home Economics

## Assignment

### Session: 2020-2021

### Subject: Home Economics

# Certificate

*Certified that the Practicals written in this practical notebook is satisfactorily performed by*

*Master/Miss* Sushmita . R. Irpate

*Class* B.A I *Sec* ______ *Roll. No.* ______

*During the Academic session* 2020 - 2021

______ *Date*

______ *Teacher Incharge*

*Seal of School / College* SEAL

*Sig. of H.O.D. / Principal*

PRINCIPAL
Yashodhara Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

Page No. | Date

# अनुक्रमणिका

1. अंदाजपत्रक
2. कौटुंबिक अंदाजपत्रकाचे महत्त्व
3. कौटुंबिक अंदाजपत्रकाचे प्रकार
4. अंदाजपत्रक तयार करणे.

SEAL

Teacher's Signature


MEDICINE
HOUSEHOLD
TRAVEL
KIDS
FAMILY BUDGET
HOUSE
CLOTHES
FOOD
TRANSPORT
ENTERTAINMENT


MASLOW'S HIERARCHY OF NEEDS
ABRAHAM MASLOW
SELF-ACTUALIZATION
ESTEEM
LOVE/BELONGING
SAFETY
PHYSIOLOGICAL

Page No. | Date

☆ कौटुंबिक अंदाजपत्रकाचे महत्त्व :- "कुठल्याही कुटुंबाचे अंदाजपत्रक हे त्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीचा आरसा असतो ; ज्याद्वारे त्या कुटुंबाचे उत्पन्न, बचत, होणारा खर्च, खर्च करण्याची कुशलता इत्यादी. गोष्टींची माहिती कळू शकतो. कौटुंबिक अंदाजपत्रकाचे महत्त्व पुढीलप्रमाणे :-

(1) अंदाजपत्रकामुळे कुटुंबाच्या उत्पन्नाचे आणि त्याला अनुसरून केल्या जाणाऱ्या खर्चाचे चित्र स्पष्ट होते. त्यामुळे खर्चाबाबत योग्य मार्गदर्शन मिळते. त्यामुळे अनावश्यक खर्चाला आळा बसतो.

(2) अंदाजपत्रक व्यक्तीस उत्पन्नाच्या मर्यादेत राहण्यास शिकवते.

(3) अंदाजपत्रकामुळे सजग निर्णय प्रक्रियेत प्रोत्साहन मिळते व अंदाजपत्रकात दीर्घकालीन ध्येय प्रतिबिंबित होण्यास मदत होते.

(4) अंदाजपत्रकामुळे उत्तम क्रयक्षमता वृद्धिंगत होऊन चांगली ग्राहकता शिकता येते.

(5) समाजशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ कौटुंबिक अंदाजपत्रक कुटुंबाच्या जीवनमानाच्या खर्चाचा निर्देशक म्हणून उपयोग करतात.

SEAL

Teacher's Signature ________

Page No.
Date

✡ कौटुंबिक अंदाजपत्रकाचे प्रकार पुढीलप्रमाणे :-
① संतुलित अंदाजपत्रक
② बचतीचे अंदाजपत्रक
③ तुटीचे अंदाजपत्रक

① संतुलित अंदाजपत्रक :-

या प्रकारच्या अंदाजपत्रकात उत्पन्न व खर्चामध्ये सदैव संतुलन असलेले आढळते. याला साधारण अंदाजपत्रक असेही म्हणतात. त्यामुळे मिळणारे उत्पन्न व प्रस्तावित खर्च सारखा असतो. यामध्ये बचत ही दाखवल्या जात नाही तसेच कर्ज घेण्याची आवश्यकताही दाखवलेली नसते.

संतुलित अंदाजपत्रक = मिळणारे उत्पन्न = प्रस्तावित खर्च

② बचतीचे अंदाजपत्रक :-

या अंदाजपत्रकात प्रस्तावित खर्च हा अपेक्षित उत्पन्नापेक्षा कमी असतो. तसेच त्या काळात थोड्या प्रमाणात बचतही केल्या जाते. अर्थात सर्व आवश्यकतांवर खर्च केल्यानंतर उरलेले उत्पन्न दाखवले जाते. अशाप्रकारे अंदाजपत्रक नेहमी लाभदायक असते.

बचतीचे अंदाजपत्रक = प्रस्तावित खर्च < अनुमानित उत्पन्न

SEAL

Teacher's Signature

Page No.
Date

(3) त्रुटीचे अंदाजपत्रक :-

या प्रकारच्या अंदाजपत्रकामध्ये मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा होणारा खर्च अधिक असतो. त्यामुळे आवश्यकता पूर्ण करण्याकरिता कर्ज घ्यावे लागते किंवा जुन्या साठवलेल्या पैशातून खर्च करावा लागतो. या प्रकारचे अंदाजपत्रक कुटुंबाकरिता नेहमी हानिकारक असते.

अंदाजपत्रक = प्रस्तावित खर्च > अनुमानित उत्पन्न

☆ अंदाजपत्रक तयार करणे :-

"अंदाजपत्रक तयार करणे ही एक प्रक्रिया असते. प्रत्येक कुटुंबामध्ये अंदाजपत्रक तयार करत असताना कुटुंबाला मिळणारे उत्पन्न व होणाऱ्या खर्चामध्ये संतुलन असायला हवे.

कौटुंबिक अंदाजपत्रक तयार करण्याकरिता काही पायऱ्यांना उपयोग करणे आवश्यक आहे. या पायऱ्या पुढीलप्रमाणे आहेत.

⇒ अंदाजपत्रकाच्या पायऱ्या :-

1. अंदाजपत्रकाच्या कालावधीचे निर्धारण
2. आवश्यक वस्तू व सेवांची सूची बनवणे.
3. अपेक्षित वस्तूंची अंदाजाने किंमत काढणे.
4. अपेक्षित एकूण उत्पन्नाचा अंदाज घेणे.
5. उत्पन्न व खर्चात समतोल साधणे.
6. अंदाजपत्रकाची तपासणी करणे
7. समायोजन

SEAL

Teacher's Signature

# Functions of the Family

## 1. Meeting Basic Needs

a. Physical Needs:

- Food
- Clothing
- Shelter
- Health & Safety




6 mos.
2 yrs.
5 yrs.
8 yrs.
11 yrs.
14 yrs.
16 yrs.

Page No.
Date

③ अपेक्षित वस्तूंची अंदाजाने किंमत काढणे :-

वस्तू व सेवांची सूची तयार केल्यानंतर वस्तूंची अंदाजाने किंमत काढावी लागते. याकरिता बाजारभावाचे ज्ञान असणे आवश्यक असते. त्यामुळे एकूण खर्च किती येईल याचा अंदाज येतो. वस्तूंची अंदाजे किंमत काढताना पूर्वीच्या बाजारभावात संभाव्य वाढ मिळवून किंमत काढावी. खर्चाच्या विविध बाबींच्या अंदाजे किंमती काढल्यानंतर एकूण खर्चाचा हिशोब काढावा. हे काम कंटाळवाणे वाटत असेल तरी अंदाजपत्रकाच्या यशस्वितेसाठी हे आवश्यक असते.

अपेक्षित ~~वस्तूंची~~ एकूण उत्पन्नाचा अंदाज घेणे :-

नियोजित अंदाजपत्रकाच्या कालावधीमध्ये सर्व स्त्रोतांपासून मिळणाऱ्या अपेक्षित एकूण उत्पन्नाचा अंदाज घेतल्या जातो. नोकरी करणाऱ्यांचे मासिक उत्पन्न निश्चित असते. परंतु व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीच्या महिन्याच्या उत्पन्नात अनिश्चितता असू शकते. कौटुंबिक उत्पन्नात कुटुंबातील सर्व व्यक्तींची कमाई समाविष्ट असते. गृहिणीने लहान उद्योग सुरु केलेले असल्यास त्यातून मिळणारा नफा कुटुंबाच्या उत्पन्नाचा भाग असतो.

निश्चित उत्पन्नाचा अंदाज घेताना कमावत्या सदस्यांचे घरापर्यंत येणारे वेतन गृहीत धरावे. बोनस जादा कामाचा मोबदला, जोडधंद्यातून मिळणारे उत्पन्न इ. उत्पन्न हे अनिश्चित उत्पन्न म्हणून एकत्रित करावे. या पैशाचे नियोजन करमणूक, सुखसोयी, चैनीच्या गोष्टी व बचतीकरिता करावे.

SEAL

Teacher's Signature

Page No.
Date

5) उत्पन्न व खर्चात समतोल साधणे :-

अपेक्षीत उत्पन्न आणि खर्चात समतोल साधणे महत्त्वाचे आहे. अंदाजपत्रक तयार करण्यातील ही महत्त्वाची पायरी आहे. ज्या अंदाजपत्रकामध्ये उत्पन्न व खर्चात समतोल असतो, तसेच उत्पन्नापेक्षा खर्चाचा अंदाज कमी असतो व त्यामुळे बचत होऊ शकते त्याला चांगले अंदाजपत्रक असे म्हणतात. अंदाजपत्रकात जर खर्चाची राशी अधिक असेल तर प्रत्येक मथळ्याखालील अनावश्यक किंवा कमी उपयोगी वस्तूंना काढून टाकायला हवे. जर कुटुंबातील वस्तू आणि सेवेवर जास्त खर्च होत असेल तर समतोल साधण्यासाठी उत्पन्नात वाढ करणे, आवश्यक वस्तूंसाठी होणारा खर्च कमी करणे अनावश्यक खर्च वगळणे आवश्यक असते.

अंदाजपत्रकात अपुरे उत्पन्न व जास्तीच्या खर्चामुळे असमतोल होऊ शकतो. अपुरे उत्पन्न असल्यास मौद्रिक उत्पन्न वाढवून तर जास्तीचा खर्च असेल तर त्यामध्ये कपात करून अंदाज-पत्रकात समतोल साधता येतो.

SEAL

Teacher's Signature

Page No.
Date

⑥ अंदाजपत्रकाची तपासणी करणे :-

अंदाजपत्रक तयार करण्यातील ही शेवटची पायरी आहे. अंदाजपत्रकाची यशस्विता त्याच्या प्रत्यक्ष उपयोगावर अवलंबून असते. यासाठी अंदाजपत्रकाच्या वास्तविकतेसाठी त्याची तपासणी करावी. कुटुंबातील सर्व सदस्यांना समाधान मिळवून देण्यासाठी अंदाजपत्रकामध्ये अनपेक्षितपणे उद्भवणाऱ्या खर्चाची तरतूद असावी. हे सुद्धा पाहणे आवश्यक आहे की, अंदाजपत्रक संतुलित करण्यामध्ये आवश्यक वस्तूंनाच यादीतून हटवले आहे का? अंदाजपत्रक ज्या वेळेस दीर्घकालीन उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी तयार केले जाते तेव्हा ही बाब महत्त्वाची ठरते.

⑦ समायोजन :-

अंदाजपत्रकात लवचिकता असणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकावर नियंत्रण करणे म्हणजे ज्या नियमाखाली वस्तूवर खर्च दाखवला आहे, तेवढाच होत आहे हे पाहणे. कधी कधी त्यामध्ये बदलही करावा लागतो. उदा. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला अपघात झाला तर आवश्यक वस्तूंवरील खर्च कमी करून समायोजन करावे लागते. एखादे वेळेस आवश्यकता पडल्यास अंदाजपत्रकात बदल करावे लागते.

SEAL

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

Teacher's Signature